# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या 40 व्या **पुण्यतिथी निमित्त** गुरूवार **दिनांक 30 डिसेंबर 2021** रोजी सकाळी 10.30 वाजता अतिथीगृहासमोरील तसेच सकाळी 10.45 वाजता विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयाच्या इमारतीमधील पोर्चमध्ये मा. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्केसाो यांचे शुभहस्ते डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळयास व प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला आहे. **सद्या कोव्हीड–19 च्या कोरोना महामारीच्या अनुषंगाने शासनाने घालुन दिलेल्या नियमानुसार सोशल डिस्टंन्सींगचे पालन करुन मोजक्याच लोकांच्या समवेत सदरचा कार्यक्रम आयोजित केला असल्याने** संबंधीत प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी/विद्यार्थीनींनी उपस्थित रहावे.

अधीक्षक
विद्यार्थी भवन

अधिक्षक
डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन
''कमवा आणि शिका'' योजना,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

संदर्भ क्रं. शिवाजी विद्यापीठ/विद्यार्थी भवन/समक्ष
दिनांक : 17. 12. 2021

प्रति :

1. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांनी आपल्या विभागातील संबंधीत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी/विद्यार्थ्यीनी यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
2. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील संबंधीत सेवकांना कार्यक्रमाला उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
3. सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डावर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व संबंधीत विद्यार्थ्यांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी सुचना द्याव्यात.
4. अभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सुचना सर्व संबंधितांना द्यावी.
   अ) मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये डॉ. आप्पासाहेब पवार यांची प्रतिमा उपलब्ध करून देणेबाबत.
   ब) माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचे पुतळयाच्या परिसरात स्वच्छता ठेवण्याबाबत.
   क) माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या अतिथीगृह येथील पुतळयास सकाळी 10.30 वाजता मा. कुलगुरूसाो यांचे शुभहस्ते पुष्पहार घालणेत येणार आहे. तरी त्यासाठी पुतळयाच्या ठिकाणी शिडीची व्यवस्था करावी.
   ड) कार्यक्रमाचे ठिकाणी तसेच मुख्य इमारतीमधील पोर्च व डॉ. आप्पासाहेब पवार यांचे पुतळा परिसरात स्वच्छता ठेवणेबाबत.
5. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या ठिकाणी कुंड्या ठेवाव्यात तसेच कार्यसुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.
6. श्री जयदीप गुरव शिपाई यांनी दोन पुष्पहार, फुले व पुजा साहित्य यांची व्यवस्था करावी.
7. श्री. देवगोंडा चौगुले, जमादार व श्री. शिवाजी बापू डोंगळे, जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टुल उपलब्ध करून द्यावे व कार्यक्रमाच्या वेळी एक शिपाई या विद्यार्थी भवनच्या शिपायास मदतीस देणेत यावा अथवा स्वतः उपस्थित रहावयाचे आहे.
8. भांडार विभागप्रमुखांनी कार्यक्रमासाठी इस्त्रीचे पांढरे शुभ्र/स्वच्छ पुरेसे कापड पुरविण्याची व्यवस्था करावी.
9. मा. सचिव, डॉ. आप्पासाहेब पवार कमवा आणि शिका प्रबोधिनी यांनी कार्यक्रमाची सूचना प्रबोधिनीच्या इतर सदस्यांना देणेची आहे.